म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ८२५

REFBK 0004971
REFBK-0004971

# जय–मङ्गला

काव्य १०७९
१५१५३३

६६८८

# कवि " यशवन्त " यांचीं पुस्तकें.

**मित्र-प्रेम-रहस्य.** मित्र-विरहावर एक सुन्दर करुणरसपर काव्य. कविता मनास चटका लावणारी असून प्रारम्भीचें अल्प चरित्रही मनन करण्याजोगें आहे.

—केसरी.

**यशवन्ती.** निरनिराळ्या प्रसङ्गीं प्रकाशित केलेल्या कविता कवीनें पुस्तकरूपानें एकत्रित केल्या आहेत. कविता सरस व स्फूर्तिदायक आहेत यांत शङ्का नाहीं.

—चित्रमयजगत.

**यशोधन.** [ ' इन्दुकला ' या काव्यासह ]. रसिकांच्या अत्यन्त आवडीचा कविता-सङ्ग्रह. " यशवन्त जितके कल्पक तितकेच सहृदय आहेत.... ' यशोधनांत दृष्टीला पडणारें कल्पनावैभव अतीशय उज्ज्वल आहे........इतकीं विविध आणि इतकीं उत्कृष्ट भावगीतें नवीन पिढींतील दुसऱ्या कोणत्याही कवीनें लिहिलेलीं नाहींत."

—ग. त्र्यं. माडखोलकर ( अरुण मासिक ).

**भावमन्थन.** ' यशोधना'चें हें भावण्ड तितकेंच सरस आणि भावमधुर आहे.

**बन्दीशाळा.** बालगुन्हेगारांच्या करुण स्थितीवरील खण्डकाव्य. " काव्यप्रतिभेनें रसरसलेलें, उपमासौन्दर्यानें नटलेलें, वत्सलतेनें भरलेलें, करुणारसानें पाझरलेलें व नीतिकुसुमांनीं मोहरलेलें असें हें यशवन्ताचें खण्डकाव्य आधुनिक काव्यांत अप्रतिम असून महाराष्ट्रीय रसिकांच्या अन्तःकरणांत त्याला चिरकाल स्थान मिळेल अशी आशा आहे." —विविधवृत्त.

रविकिरणमण्डळाचें विसावें पुस्तक.

# जय-मङ्गला

[ एक प्रेमकथा ]

REFBK-0004971

REFBK-0004971

## यशवन्त

प्रकाशक

प्र. श्री. कोल्हटकर, बी. ए.

५ खटाववाडी, गिरगांव, मुंबई ४.

किंमत १ रु.

कवि यशवन्त

यांचा

नवीन कवितासङ्ग्रह

# ओ ज स्वि नी

लवकरच प्रसिद्ध होईल.

---

'जयमङ्गला' या काव्याच्या पुनर्मुद्रणाचे व इतर
सर्व हक्क कवीकडे आहेत.

---

मुद्रक— मंगेश नारायण कुळकर्णी,
कर्नाटक प्रेस, ३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई २.

काव्य १८०
१५५३

# नजराणा

करमेनासें कुठेंहि होतां मला कशानेंही
येतसे मी तुझिया गेहीं

स्मितानने! सङ्गतीमधें तव जातां क्षण कांहीं
उजळती मनोदिशा दाही

धुक्यांत वासरमणी दडलेले महदाकाङ्क्षांचे
घडे मग दर्शन मज त्यांचे

आणि सकल सङ्कल्प साङ्गतों तुझ्या मनें तूतें
पाहुनी तुलाहि रुचती ते

खगोल ते सारेंच लुटाया उठाव मन घेई
अशी तूं मला स्फूर्तिदायी

परि न तुला जाणीव आपुल्या अशा प्रभावाची
न किंवा मदीय भावाची

मनोदेवते! तथापि कारण तूंच होसि ज्यांना
तयांचा हा तुज नजराणा

समर्पितों तव मानसपूजा करितां दिन-रातं
नसे हें तुला जरी ज्ञात

१३-१२-३९

यशवन्त

# गीतानुक्रम


| | पृष्ठ |
|---|---|
| कवीची भूमिका | ७ |
| फिरस्ता. | १७ |
| टेकवूं हा श्रान्त माथा मी कुठें ? | १९ |
| पायबन्द. | २१ |
| विसङ्गतींतील गूढ. | २३ |
| ओढणी. | २५ |
| मनोगत. | २७ |
| वेडी आशा. | २९ |
| भूषणें कशाला ? | ३२ |
| असे मी सेवक— | ३४ |
| वन-विहार. | ३६ |
| हा काय माझा गुन्हा ? | ३९ |
| उत्कण्ठा. | ४२ |
| न्यायासनींच्या देवते ! | ४३ |
| तुझियाविना. | ४७ |
| जर कधीं न होती भेट— | ५१ |
| सङ्गमावर— | ५३ |
| ताटातूट— | ५६ |
| साङ्ग तूं सजा खुशाल— | ५९ |
| नजर कैद. | ६१ |
| वधस्तम्भापाशीं. | ६३ |
| मृत्युपन्थें— | ६६ |
| जय-मङ्गला. | ६८ |

# कवीची भूमिका

कवीची भूमिका पुष्कळ वेळां वाचकांना नीटशी समजली जात नाहीं. प्रामुख्यानें भावगीतें लिहिणें हा अलीकडील कवींचा प्रघात आहे. पूर्वीच्याही कवींनीं भावगीतसदृश रचना केली असली तरी तिचे विषय इतके मर्यादित आणि परिचित स्वरूपाचे असत कीं श्रोत्यांना कवींच्या मनःप्रवृत्तींत मिसळून जाणें दुस्साध्य होत नसे. अभङ्ग हा भावगीता-सारखाच काव्यप्रकार समजायला हरकत नाहीं. ह्या काव्यप्रकारांत सांसारिक दुक्खांच्या कहाण्या आणि प्रभुकृपेच्या आळवण्या ह्याच काय त्या भावना आविष्कृत असल्यामुळें गायकाच्या मनःस्थितीशीं मिलाफ पावणें रसिकांना मुळींच अवघड गेलें नाहीं. सन्त-कवींच्या पदांबद्दल देखील असेंच म्हणतां येईल. संसारमग्नांना ऐहिक सुखोपभोगांच्या नश्वरतेची जाणीव देऊन सावध होण्याबद्दल, पारलौकिक सद्गती सम्पादण्याकडे लक्ष देण्याबद्दल उपदेश करणें आणि परमेश्वराची करुणा भाकणें ह्यांपेक्षां निराळे विषय या गीतांतही आढळत नाहींत. एकाद्या वेळीं गीतांतले सूर शृङ्गाराच्या सीमेजवळून जात असतील तर दुसऱ्या वेळीं वात्सल्याच्या वातावरणांतून उमटत असतील इतकेंच. परन्तु पर्यवसानीं ईश्वरभक्तीच्या प्राणसुरांत ते विलीन झाल्याशिवाय राहावयाचे नाहींत. म्हणून तीं पदें देखील अभङ्गाप्रमाणें आकलनसुलभच होतीं. अगदींच दूरान्वयी रूपकाच्या बुरख्यांत क्वचित् लिहिलेल्या प्रहेलिका सोडल्या तर बाकीच्या बहुतेक पदांबद्दल हेंच म्हणतां येईल.

पण्डित कवींच्या मनोभूमीचेंही कधीं कोडें पडलें नाहीं. कारण ईश्वराचें लीलालाघव भाविकतेनें शब्दांत रङ्गविणें ह्या ध्येयाबरोबर आणि ह्याच

ध्येयाला पोषक म्हणून गीर्वाण भाषेंतील पौराणिक कथा प्राकृत पद्यांत साङ्गणें हेंही त्यांनीं कार्य केलें आहे. पण त्या कथा कळण्याकरितां विचाराच्या विशिष्ट पायरीवरून कवि गात आहे कीं काय अशी शङ्का घेण्यासारखी त्यांत दुर्बोधता कधींच आली नाहीं. कठिण शब्दांच्या ठेचा अर्थकोशाच्या आधारानें टाळल्या कीं कवीचा हेतु समजण्यास कठीण जात नसे. कधीं कधीं पद्यपङ्क्तींत वाच्यार्थाहून अधिक कांहीं असलें तरी तेंहि अलङ्कारशास्त्राच्या दिव्यापुढें धरलें कीं दृष्टीस पडत असे. आणि हा दिवा एकाद्यास हस्तगत झाला नाहीं तरीही पण घोटाळा होण्याचें कारण नसे. आनन्द प्रतीत व्हायचा तो स्थूलमानानें होत असेच. त्या आनन्दाचें नांव 'अर्थान्तरन्यास' किंवा 'छेकापन्हुति' अथवा 'सार' किंवा आणखी कोणतें तें जरी उमगलें नाहीं तरी अडत नसे. अपत्याच्या मुखावलोकनानें मातेच्या हृदयांत दाटणारा वात्सल्याचा पान्हा बारशानन्तरचा असतो असें नाहीं. पक्वान्नाला आलेली रुचि कोणकोणत्या पदार्थांच्या प्रमाणशीर मिश्रणानें आली आहे हें न उमगलें तरी आस्वादाला हानि येत नाहीं. सारांश पण्डित कवींनाही अर्थविपर्यासाचें दुर्भाग्य लाभलें नाहीं.

शाहीर कवी तर सर्वसामान्य समाजाकरितांच गात असत असें दिसतें. पण्डितांच्या माण्डीला माण्डी लावण्याची त्यांनीं आकाङ्क्षा बाळगली नाहीं आणि सन्तांच्या पायरीला पाय लावण्याची धिटाईही दाखविली नाहीं. कीर्तन-पुराण-श्रवणानें त्यांच्या देखील स्फूर्तीनें परमेश्वरी स्तुतिस्तोत्रें आळविलीं आणि उपदेशाचे धडे दिले. तथापि शृङ्गार व वीर हेच त्यांचे मुख्य रस आणि तेही सुसंस्कृतांच्या शब्दजालापासून आणि अलङ्कारांच्या अट्टाहासापासून बहुशा अलिप्त. तेव्हां न समजण्यासारखें असें त्यांच्याही पद्यरचनेंत कांहीं आढळत नाहीं.

अर्वाचीन कवितेचा सुभा कांहींसा सवता आहे. केवळ उपदेशपर किंवा निव्वळ सृष्टिवर्णनपर कविता सोडून दिली तर बाकीची जी भाव-कविता उरते ती समजण्यास एक विशिष्ट मनोरचना गृहित धरावी

लागते. भावकविता म्हणजे भावनेचें त्रुटित दर्शन. कवीच्या मनाला मिळालेला हेलकावा तींत उतरलेला असतो. तेव्हां त्या हेलकाव्याशीं समरस होण्याला, त्याची प्रचीति वाचकाच्या मनाला यायला, कवीच्या मनाची काव्यनिर्मितिपूर्वींची स्थिति वाचकांनीं अध्याहृत धरायला हवी. चालत्या आगगाडींत चढतांना किंवा तीमधून उतरतांना तिच्या गतीच्या दिशेनें आपणासही थोडीशी गति घ्यावी लागते; एरव्हीं तोण्डघशीं पडण्याची पाळी येते. कवीची भूमिका कळल्याशिवाय त्याच्या उद्गारांचें रहस्य नीट कसें समजणार? मन मायावी आहे, त्याचे व्यापार गूढ असतात. आधुनिक कविता भावनांचा आविष्कार करूं पाहते; म्हणजे, मनोव्यापार हें तिचें अधिष्ठान आणि संसाराच्या महोदधीवर घडोघडी उठणाऱ्या निरामय सुखदुक्खांच्या वीचींवर तरङ्गणें हा तिचा विलास. तेव्हां तिचा कल मानसशास्त्राकडे बराच झुकत चालला आहे, हेंच आज तिजविषयींचें निदान होय. " सूर्यवंशीं उत्तानपाद राया " होता, असला— एक आटपाट नगर होतें ह्या धर्तीचा—प्रारम्भ तिला आवडत नाहीं. " ज्ञाते हें अम्बरीष-क्षितिपति-चरितीं पाहती शुद्ध तत्त्व " असला तात्पर्यकथनाचा आव ती आणीत नाहीं. " भाव धरारे, अपुलासा देव करा रे " म्हणून ती कानीं-कपाळीं आरडत नाहीं. हे मार्ग तिला सर्वस्वींच वावडे आहेत असें नाहीं. परंतु या मार्गांची तिला तितकिशी अभिरुची राहिली नाहीं. आज ती " तळहातीं स्वशिरातें घेउनिया बैसली " अशा शब्दांनीं हतभागिनीचें चित्र रङ्गवूं लागली म्हणजे तिच्या ठिकाणीं आपण वैभवहीन हिन्दभूमीची मूर्ति पाहावी अशी तिची इच्छा असते. " अजुनि चालतोंचि वाट, माळ हा सरेना । विश्रान्तिस्थल केव्हां यायचें कळेना " असे बोल बोलवितांना, इहलोकच्या यात्रेंत अनेक धक्केचपेटे सोसून, प्रापञ्चिक व्याप-सन्तापांनीं रञ्जीस आलेला, परलोकच्या दारीं जाऊन टेकायला अधीर झालेला श्रान्त प्रवासी डोळ्यापुढें उभा रहावा असा तिचा हेतु असतो. नुसत्या कवितेचेंचसें काय, पण ललितकलेचीच आज

अशी अभिरुची झालेली आहे. तिच्यापुढें राजा रविवर्म्यांचें " ऋतुध्वज-मदालसा " हें चित्र धरलें तर ती मदालसेच्या अभिनयावर सन्तुष्ट होईल; पण शेजारचा ऋतुध्वज तिला अनवश्यक वाटेल—झाकून ठेवावासा वाटेल. आणि कारण विचारल्यास समर्थन असें करील कीं ' मदालसेच्या लज्जाविनम्र अभिनयानें आणि दृष्टीच्या रोखावरून, जवळपास तिचा वल्लभ उभा आहे हें न अन्दाजतां येण्याइतकी रसिकता पाङ्गळी आहे काय ? " सत्यवानाच्या गळ्यांत आपला पाश टाकून त्याला नेण्यासाठीं उभा ठाकलेला यमधर्म प्रत्यक्ष प्रगट झालेला, सावित्रीला जितका पाहवला नसेल त्याहूनही अधिक आजच्या चित्रकलेला पाहवणार नाहीं. यमाचें अस्तित्व जाणवण्यासाठीं शोकविव्हल सावित्रीच्या समोर अन्धुक छायामय अशी भीषण व श्यामल आकृति उभी आहेसा भास करविणेंच तिला अधिक युक्त वाटेल. नेहमींच नखशिखान्त वा आपादमस्तक व्यक्ति ढळढळीत रङ्गविण्यापेक्षां कुठें नुसत्या हाताच्या अभिनययुक्त पंजावर तर कुठें नुसत्या पदक्षेपावर आपला कार्यभाग उरकून घेण्यांतच चातुरी आहे असें ती आज प्रतिपादन करील. क्षितिजाचा प्रान्त आरक्त झाला कीं पडद्यापाठीमागें प्रभाकराची मूर्ति ठाकली असली पाहिजे असा कयास सहज करायला येईल. ती म्हणते बाजारपेठेंतील वस्तूंचें प्रदर्शन मला आवडत नाहीं. माझ्या दाराशीं मी राङ्गोळी घालीन आणि तिच्यावरून रसिकांनीं तर्क करावा कीं आंत मंगलागौरीची आरास माण्डिली आहे. आधुनिक भावकवितेची विचारसरणी आणि स्वरूप हें असें आहे.

पुढें करण्यांत येत असलेली प्रेमकथा म्हणजे उपरोक्त स्वरूपाच्या भावगीतांची एक पङ्क्तीच आहे. आणि तिचें वैशिष्ट्य हें आहे कीं तीमधील प्रत्येक कवन अलगपणें वाचलें तरी तें स्वयम्पूर्ण आहे, असें दिसून येईल. पुष्पमाला अनेक फुलांची झालेली असते. पण तीमधील फुलें निराळीं काढलीं तरी त्यांना पूर्णत्व असतेंच. नभोमण्डळांत चमकणारे तारे हे जसे निरनिराळे आहेत, तसेच त्यांचे विशिष्ट माण्डणीमुळें निश्चित करतां

येणारे पुञ्ज म्हणजे नक्षत्रेंच होत. अशा प्रकारें पुढील पङ्क्तीमधील प्रत्येक कवन हें एक एक स्वतन्त्र भावगीत आहे; पण त्याबरोबरच तें एका समग्र कथेचा अवयव आहे; दुवा आहे. त्यांच्या गुम्फणीनें एक प्रेमकथा साद्यन्त साङ्गण्यांत आली आहे. सर्व कवनांतून प्रणयी युवकाचें आत्मगत वा प्रगट उद्गार आहेत आणि त्यांतून कथेची परिणति होत गेली आहे, असें आढळेल. प्रत्येक कवनाची उभारणी कांहीं तरी भाव अध्याहृत धरून झालेली आहे. गद्यांत निवेदन करण्यांत येत असलेलीं सर्वच स्थित्यन्तरें इथें शब्दांत व्यक्त केलेलीं नाहींत. त्यामुळें कथेची प्रगति कळून येण्यास, आरम्भींच्या सामान्य विवेचनांत म्हटल्या-प्रमाणें, ज्या भूमिकेवरून नायकाचे उद्गार निघत आहेत ती भूमिका अवगत करून घेतली पाहिजे. क्वचित् स्थळीं दोन कवनांच्या दरम्यान बरीच घडामोड गृहित धरली गेल्यामुळें सांखळी तुटल्यासारखें अथवा पायरी गळल्यासारखें वाटण्याचा सम्भव आहे; तर, उलट पक्षीं अगदींच सूक्ष्मतेनें पाहूं गेल्यास प्रत्येक कवनांत वाढत्या पायरीची स्पष्ट रेषा दिसणार नाहीं. क्रमाक्रमानें एकेका वाढत्या पायरीवर अधिष्ठित होऊन मनाचे बोल बाहेर पडत असले तरी क्वचित् पुढच्या व मागच्या पायऱ्यांना त्यांचा स्पर्श होत असलेला दिसून येईल. पूर आलेल्या नदीचें पाणी अमुक एका पायरीला लागलें आहे असें जेव्हां म्हणण्यांत येतें तेव्हां तें तरङ्गांच्या कल्लोळानें खालीं-वर सरकत असतेंच. किंवा गवयाची तान चढत्या उतरत्या सुरावरून जात येत असतां ती मागच्या व पुढच्या सुरांना चाटून जात असते. वाऱ्यानें हलणाऱ्या वृक्षाप्रमाणें किंवा लाटांनीं डोलणाऱ्या पडावाप्रमाणें, पुढील कवनांतील भावनाही आगेंमागें आन्दोलनें घेत आहेत असा अनुभव येईल. ढळढळीत सीमारेषा काढूं गेल्यास ती निघेलच असें नाहीं. चञ्चल जलाशयाच्या तळाशीं पडलेल्या वस्तूची किंवा धुक्यांत गुरफटलेल्या सूर्याची रूपरेखा रेखीव दिसत नसते. शिवाय अन्धुक रेखांनीं सौन्दर्याला बाध येतो असें तरी कसें म्हणतां येईल ?

इन्द्रधनुष्यांतील रङ्गांचे पट्टे सतरन्जींतील पट्ट्यांप्रमाणें जोडलेले नसून प्रणयी जीवांप्रमाणें एकमेकांत विलीन झालेले असतात; आणि म्हणून त्यांत सौन्दर्याची खुलावट अधिकच झालेली दिसते. दिवसाचा सरता प्रकाश आणि रात्रीचा चढता अन्धार यांची सान्धसोड इतकी बेमालूम झालेली असते कीं त्यांची सरहद्द सांपडणें अशक्य असतें.

प्रस्तुत समग्र काव्य एक-मुखी तर आहेच; पण तसें तें वदविलें जात असतांना दुसऱ्या व्यक्तीची – युवकाच्या प्रीतिपोष्णेच्या मनाची छाया या भावोद्गारांतून प्रतिबिम्बित झालेली दाखविली आहे. युवकाप्रमाणें तिच्याही हृदयांत सहसंवेदना उद्भवल्या असून तदनुसार तिच्या ज्या हालचाली होत आहेत त्या युवकाच्या प्रेमराज्याला पोषक होत गेल्या आहेत हें सूचित करण्याकडेही अवधान देण्यांत आलें आहे. तिच्या अभिनयांतून, भावगर्भ वाणींतून किंवहुना करणींतून प्रेमाची साक्ष युवकाला पटली, तशी ती त्याच्या उद्गारांतून वाचकांना ओघाओघानें पटविणें अवश्य होतें.

ही गीतपङ्क्ती वाचतांना – विशेषता उत्तरार्धांतील घडामोडी पाहतांना बिल्हणकवीच्या प्रेमकथेचा वाचकांना आठव होण्याचा सम्भव आहे. मराठींत बिल्हणाची प्रेमकथा विठ्ठल कवीनें गायिली आहे. त्या काव्याच्या उत्तरार्धांत बिल्हणाला सुळावर चढविण्यांत येण्यापूर्वी, त्यानें राजकन्येचें किम्बहुना तिच्याशीं केलेल्या शृङ्गारचेष्टांचें केवळ चिन्तन केलें आहे. आणि समग्र कथानकांत याच प्रकरणाला प्राधान्य आहे. आधुनिक कविता असल्या प्रकारच्या म्हणजे केवळ वैषयिक शृङ्गाररसांत रममाण होत नाहीं. ‘ प्रेम ’ हा एक अभिनव उदात्त असा मनोभाव तिनें अङ्गिकारला आहे. असल्या प्रेमभावाचा प्राचीन काव्यकृतींत अभाव आहे. तिच्यामधील शृङ्गाररसाच्या उठावांत आवृत अगर अनावृत विषयोपभोगाची झांक असायचीच. आधुनिक काव्यांतील प्रेमरस हा प्राचीन शृङ्गाररसापेक्षां भिन्न आहे. म्हणून विठ्ठलाचें काव्य सर्वांशीं दृष्टि-आड करून, बिल्हणाच्या प्रेमलीलेची दन्तकथा तेव्हढीच पुसटपणें आधारास घेऊन प्रस्तुत काव्याची

उभारणी, माण्डवावर चढविलेल्या वेलीप्रमाणें, नवीन अभिरुचीला अनुसरून, प्रेमभावावर केली आहे. कथानकाच्या पर्यवसानाप्रमाणेंच नायक-नायिकेमधील गुरु-शिष्या हें नातें पाहूनही बिल्हण-चरित्राची आठवण होणें शक्य आहे. पण गुरु व शिष्या यांच्यामध्यें अशा तऱ्हेचा प्रेमसम्भव झाल्याचें बिल्हण-शशिकला हेंच एक उदाहरण आहे असें नाहीं. गुरु व शिष्या यांचें वयोमान, बुद्धिविकास, विद्याभिरुची आणि गुणमोहिनी ह्या बाबतींत अनुरूपता असल्यावर परस्परांच्या हृदयांत एकमेकांविषयीं प्रेमभाव रुजणें नवलाईचें नाहीं. अशा ठिकाणीं गुरु व शिष्या ह्या भूमिका परस्परांना निकट आणण्यापुरत्या निमित्त-मात्र होत. इतरत्र प्रथम-दर्शनीं निर्माण होणारें आकर्षण गुणरूपांनीं दृढतम व्हावयाचें असतें आणि त्याकरितां हवें असलेलें साहचर्य मिळविण्यासाठीं किती तरी यातायात पडते—आणि पुष्कळ वेळां निराशाच पदरीं येते. उलट गुरु व शिष्या हें नातें प्रेमसम्भवाला पोषकच होतें. गुरुशिष्येचा दैनिक सहवास हक्काचा व स्वातन्त्र्याचा असूं शकतो; आणि अध्ययन-अध्यापनाला उठाव आणणारी रसज्ञतेची पार्श्वभूमि निर्माण झाली कीं त्या पार्श्वभूमींतून अनुरागाच्या छटा उमटूं लागतात. मनःस्थितींतील आन्दोलनें हवामानांतील फेरबदला-सम्बन्धींच्या बुरख्यांतून बोलूं लागतात. क्रमिक पुस्तकांमधून येणाऱ्या रसाळ प्रसङ्गांची खुलावट आणि वडिलधाऱ्या माणसांची सवलतीची प्रेमळ वागणूक या गोष्टींनीं गुरुशिष्येचें परस्पराकर्षण अधिकाधिक दृढ होत जातें.

परस्परांच्या मुखावलोकनाच्या अभावांत देखील, केवळ दीर्घ-काल सान्निध्य आणि अध्ययन-अध्यापन यांतील प्राविण्य, रसज्ञता व प्रतिभा यांची जुळणी गुरु व शिष्या यांजमधील प्रेमसम्भवाला पुरेशी आहे. प्राचीन काळच्या ग्रामवृद्धांनाही परिचित असलेली उदयन राजाची कथा या दृष्टीनें मननीय आहे. आपल्या रूप-गुणवती कन्येच्या—वासवदत्तेच्या सङ्गीतशिक्षणाकरितां उदयन राजाची नेमणूक करतांना, अन्योन्यांचें मीलन न व्हावें एवढ्या-

करितां वासवदत्तेच्या पित्यानें केव्हढी दक्षता बाळगिली होती! दोघांच्या मध्यें एक अपारदर्शक पडदा टाकलेला आणि एकमेकांना परस्परांच्या बद्दल घृणा येईल अशीं त्यांच्याबद्दलचीं नाहीं नाहीं तीं व्यङ्गें दोघांना साङ्गितलेलीं! पण या खबरदारीचा कांहींही परिणाम झाला नाहीं. उदयन राजाच्या शिक्षण-चातुर्यानें व रसज्ञतेनें वासवदत्ता मोहित झाली आणि तिच्या नुसत्या भाषण-गायनाच्या श्रवणानेंच तिचें लावण्य प्रतीत होऊन उदयन राजा तिच्यावर अनुरक्त झाला; आणि पडदा दूर होऊन त्यांचें मीलन झालें. पुरुषांची प्रतिभा आणि स्त्रियांचें लावण्य यांचा हा प्रभाव लक्षांत घेऊनच "कल्पकतेला गुङ्ग करून सोडणारीं शब्दचित्रें उभविणाऱ्या तरुणाबरोबर तरुणीनें फार काळ घालवूं नये" असा पोक्त इषारा (!) आधुनिक मानसशास्त्रज्ञ देऊं लागले आहेत. परन्तु गुरु व शिष्या या नात्यानें युवक व युवती जेव्हां सन्निध येतात तेव्हां परस्परांचा बौद्धिक व हार्दिक आविष्कार सहजगत्या आणि निःसंकोचपणें होऊन तो जर लोभनीय असला तर त्याचें पर्यवसान हृदयमीलनांत व्हावें यांत अनैसर्गिक तें काय आणि अनाचार तो कसला?

# जय-मङ्गला

# फिरस्ता

[ गझल–'अगोट' ]

कितीक धुण्डियले प्रान्त, पाउलें थकलीं
निवे परन्तु न हुर्हूर अन्तरामधली

जिथें विहङ्गम रङ्गीत ते परोपरिचे
यथेच्छ ऐकविती सूर-माधुरी अपुली
तरूसवें कुसुमालङ्कृता लता रमती
अशा सुरम्यहि रानीं न वृत्ति मोहरली.

विहार हंस जिथें पङ्कजांसवें करिती
तटीं तिथें बसलों पाय सोडुनी सलिलीं
तशांत चन्द्रहि ताराङ्गणीं जरी हसला
तरी अशान्ति मनींची न अल्प ओसरली

चढून शैलशिरीं चक्रवर्तिसा बसलों
तसाच खोल दरीच्या रिघून गर्द तळीं
कलण्डलों गवताच्या बिछायतीवरतीं
व्यथा तथापि मनींची न मन्द होइ मुळीं

कड्यावरून कुठें झोत कोसळे नदिचा
तुषार पुष्पपरागापरी वरी उधळी
फुले शरीर तयांनीं, दवांत जेविं तृणें
तरी मदन्तरिंची नाहिं काहिली शमली

तसाच कौतुक-दृक्क्षेप-चन्द्रिकेमधुनी
जनीं सुकीर्तिसुगन्धें तनूहि भूषविली
सुनें-सुनेंच तरी विश्व वाटुनी अवघें
जिण्यांत केविं कळेनाच शून्यता भरली ?

# टेकवूं हा श्रान्त माथा मी कुठें ?

[ गज़ल–तुङ्गभद्रा त्रिगणी अपूर्ण ]

टेकवूं हा श्रान्त माथा मी कुठें ?
कष्टहारी स्नेहशीला ती कुठें ?

जीमुळें कल्लोलिनीतें मञ्जुता
जीविता सङ्गीतकारी ती कुठें ?

ऐकुनी स्तोत्रें स्तुतीचीं माझिया
रोमरोमीं जी फुलावी ती कुठें ?

गौरवाच्या लोम्बती माळा गळां
त्यांहुनी बाहू सुगन्धी ते कुठें ?

कौतुकें नेत्रीं जिच्या पाहूनिया
भाग्य इन्द्राचेंहि वाटावें थिटें

पुष्पिताग्रा या लतांना लाजवी
माल्यभारा स्वागता गेहीं कुठें ?

ती कुठें नेत्राभिरामा जीमधें
चारुतेची साक्ष सृष्टीच्या पटे.

सौख्यही जीच्याविना व्हावें फिकें
हासतां जीं सौम्य व्हावीं सङ्कटें

आणि औदासिन्य जें ग्रासी मना
होइ तें सञ्जीवनी जी तीं कुठें ?

दीर्घही आयू गमाया अल्पसें
ती नवोन्मेषान्तरा सङ्गें कुठें ?

जी मदाकाङ्क्षा स्वभूषा मानिते
ध्येय-संवादी सखी ऐशी कुठें ?

आणखी माथा मदङ्कीं आपुला
ठेवणें ही धन्यता जी मानिते

---

नोंद नं. ८८८८
ठाणे,
आव. १००७
१५१५३३
प्र. ई. ग्रं. संग्रहालय ठाणे
सा. क्र. ..........
वि. शाखा

## पायबन्द

[ गझल–आनन्दकन्द ]

जोखीम ही कशाला  माझ्यावरी नृपाळा ?
शोभे न राजबाळी  शिष्या मुशाफराला.
ना हाव वैभवाची  ना शिङ्ग फुङ्कण्याची
गोडी न लौकिकाची  काव्यात्म या पिशाला !
विद्या कला नि शास्त्रें  सम्पादिलीं श्रमानें
तीं काय या तऱ्हेनें  सेवेस जुम्पण्याला ?
आनन्दरूप सारी  राया वसुन्धरा ही
सम्पादिलीं कलाङ्गें  आनन्द-वर्धनाला.
सौख्यांत जी खुमारी  दुःखींहि माधुरी जी
सम्पादिलीं कलाङ्गें  ती आकळावयाला.
चण्डोल जो स्वभावें  स्वच्छन्द हिण्डणारा
का लाविसी उदारा  हे पायबन्द त्याला ?

लाटांवरी रमावे चारी दिशा वहावे
का पाहिजे किनारा ह्या स्वैर गल्बताला ?
तूझ्या प्रभावळीची वाढावयास शोभा
का झूल आश्रयाची माझ्या गुणीपणाला ?
ढोङ्गामुळेंच प्यादी होतात जेथ फर्जी
प्रासाद वाटती हे उत्तुङ्ग बन्दिशाळा !
यांच्यांत नान्दतांना होईल कोण्डमारा
संस्कार नागरी ह्या ना रानपाखराला !

# विसङ्गतींतील गूढ

[ वसन्ततिलका ]

केला अनुग्रह कसा त्यजुनी स्वभावा ?
प्रश्नांत या किति तरी तव गूढ कावा !
वाटे विसङ्गतिमधी तुज गूढ का या ?
का साळसूदपण पाङ्घरतेस वाया ?

जें काल निःस्पृहपणें वदलों सभेंत
का शारदीय ढग सोडियले हवेंत ?
का वैभवास डुरळून परी नृपाच्या
गुन्तून येथ पडलो विसरून वाचा ?

हेंही खरेंच; ललिते ! तुझिया पित्याचें
ऐश्वर्य मोहक किती तुज काय त्याचें ?
तें पाहता क्षणिंच लोचनही दिपावे
स्वत्वाप्रती विसरुनी सहजीच जावें !

मी पाहिल्या अतुल मौक्तिक-रत्न-माला
त्यांची कधीं भुरळ ना पडली मनाला
स्रष्ट्यास मी उलट दोष दिला सदैव
कीं निर्मिले न मणि काञ्चन का सजीव

आल्हेरुनी नृपसभेंमधि गौरवाला
मी पाहिले नृपतिच्या उजवीकडेला
तों खिन्न काञ्चन सकम्प सबाष्प रत्नें
आलीं अकल्पित दिसून विना-प्रयत्नें !

दोषांतुनी करुनि मुक्त तदा विधीला
मी मान त्या तुकविली नृपवैभवाला
झाली प्रफुल्ल मणि-हेमलता फिरून
का साळसूदपण ठाउक हें असून ?

# ओढणी

[ जाति–मोहिनी ]

दिपवु पाहसी मज अपुल्या बुद्धिवैभवानें
आणि त्यांत तन्मय होतो मीहि कौतुकानें

अन्य-देशियांच्या सहजी बोलतेस बोली
दाखविसी प्राविण्याची ज्यांत त्यांत खोली
भाव-अर्थ-सौन्दर्याच्या ज्ञात सकल शैली
जन्म घेतला तव देहीं विरिञ्ची-सुतेनें !

विविधवाद्यवादनचतुरा नसे अन्य कोणी
शुद्धता सफाई लाघव सूक्ष्मता बघोनी
प्राणिमात्र ब्रह्मानन्दीं डोलतो भुलोनी
कला पावल्या सार्थकता तुझ्या आश्रयानें !

तुझ्या मुखीं सङ्गीताची दिव्यता दुणावे
ओठ नेत्र हलती, घेई मान हेलकावे,
डौलदार बैठक, बघुनी कोण ना सुखावे !
आणि तुला स्फुरणहि माझ्या चढे रसिकतेनें !

फेकितेस घोडा जणुं कीं अधान्तरीं जासी
हात तुझे तरवारीचे हिणविती विजेसी
पोहतेस कासारीं कीं शोभतेस हंसी
फिटे पारणें डोळ्यांचें अङ्गसौष्ठवानें !

तुझ्या अङ्ग-विक्षेपांना जोड विनयतेची
साथ कला-मण्डिततेला निगर्वीपणाची
पार्श्वभूमि सौहार्दाच्या खुले चन्द्रिकेची
ओढणी जिवाला लागे तुझ्या दर्शनानें.



# मनोगत

[ चाल–वाटलें नाथ हो॰ ]

मी मनोगतातें केवि   निवेदू तुजला ?
योजितो व्यूह तो   झणीं ढासळे सगळा !

अङ्गणीं धान्य ही टिपुनी घेई चिमणी
मत्स्यास पाखरू अचुक घेइ उचलोनी
मी वेचक बघतो शब्द तेवि जुळवोनी
परि उमटे भाव निराळा !

अपुरीच घेउनी शब्दसम्पदा येतो
परि पुढें कराया नजराणा तो बुजतो
वरपाङ्गी वदुनी आणि मागुता फिरतो
परि दुणावतोच उमाळा !

ना सावधानता मम व्यवसायामधुनी
बेचैन कण्ठितो एकसारख्या रजनी
तन्द्रेंत रङ्गती स्वप्नें तव मूर्तीनीं
जडला तव छन्द मनाला !

कधिं तुझ्या लोचनीं प्रोत्साहन तें दिसुनी
दावाया सजतो हृदय खुलें तुज करुनी
परि भीति अचानक दाखविसी निज नयनीं
नच सीमा कुटिलपणाला !

तेवते माझिया हृदयीं प्रेमज्योती
प्रतिबिम्बित नेत्रीं तिची जाहली दीप्ती
का तरिहि ना कळे माझी व्यथिता वृत्ती ?
सम्पवी लपण्डावाला !

# वेडी आशा

[ चाल–" आशीर्वाद " कवितेची ]

कां मना ठेविसी आशा ही वेड्यासारखी ?
ती राजेन्द्राची बाला
तुजसमान कङ्गालाला
सेवील केवि होवोनी व्यवहारा पारखी ?

तू धूळींतील पदाती
सहचरी केवि व्हावी ती ?—
विहराया वाञ्छी व्योमीं जी बसुनी पुष्पकीं.

मुक्ताफळ सेवायाची
अन्तरीं मनीषा ज्याची
सन्धान त्या मृगेन्द्राचें हत्तींच्या मस्तकीं !

जी तिच्या लोचनीं भाषा
पसरिते मोहिनी–पाशा
लाविसी अर्थ जो त्यांचा तो सारा भास कीं.

पाहते, हिण्डते पुढुनी
जरि वारंवार हसोनी
मृगजळीं विसम्बुन होसी कां अपुला घातकी ?

लाघवीपणें जरि बोले
जरि करी खोडकर चाळे
लाविसी केवि खद्योता ! दृष्टीं अङ्गारकीं ?

लज्जेची केव्हां छाया
कधिं आर्जव सलगी माया
अनुराग–गर्भ गणिसी का या लीला नाटकी ?

चातुरी हावभावाची
स्त्रीस्वभाव-सुलभा साची;
मानिसी मण्डिता कां ती प्रणयाच्या सायकीं ?

अङ्गारक–मङ्गळ.

गायनीं डुले जरि तुझिया
परि त्याचा मणि मिळवाया
धजतोस केवि डिचवाया रे मूर्खा ! वासुकी ?

---

# भूषणें कशाला ?

[ जाति–दिण्डी ]

गळ्यामाजी घालून रत्नमाला
धिण्ड रत्नांची काढिसी कशाला
जरी शोभा राखणें तुला त्यांची
नको दावू तरि छटाही स्मिताची.

काञ्चनाच्या नटलीस भूषणांनीं
भूषणें परि येती न तीं दिसोनी
कान्ति जाई कान्तींत लोपुनीया
चढविण्याचे श्रम जाति मात्र वाया !

मोतियांचे लोम्बती घोस कानीं
काय शोभा वाढेल तत्र तयांनीं ?
कविप्रतिभा तू मूर्त जरि विलोल
पद्यकारा मौक्तिका काय मोल ?

फुलें फुलदाणीमधीं ठेविलेलीं
पहा कैशीं विरमून लवुन गेलीं
सुगन्धा तू साक्षात हिण्डताना
केवि उन्नत तीं ठेवितील माना ?

कसे येती दिसुनी न का मयूर
कुठें दडले जाऊन काय दूर ?
तरिच म्हटलें हें आज काय झालें ?—
साज-शृङ्गारामुळें तुझ्या लीले !

उतर खालीं तो भार भूषणांचा
पुरे झाला उपहास अता त्यांचा
तूच मुळची सौन्दर्यविभवशाली
हव्या सूर्याला कशाला मशाली ?

तुला बघतांना भूषणाविनाच
भावलहरी लागती घालु नाच
सुमन उमलावें जेवि उष:काळीं
तेवि हृदया मम तूच राजबाळी !

---

# असे मी सेवक

[ जाति–शूर्पणखा ]

त्रिसरसी कसें भामिनी
असे मी सेवक, तूं स्वामिनी ॥ ध्रु ॥

आसनीं मला बसविसी
आदरें उभी राहसी
ही रीत विसङ्गत जनीं । असे मी सेवक० ॥

विमनस्क मला पाहुनी
होतेस खिन्नही मनीं
मज रिझवूं बघसी क्षणीं । जरी मी सेवक० ॥

जरि चुकुनी आज्ञापिसी
परि माझा कल पाहसी
तें बजावितां शरमसी । जरी मी सेवक० ॥

अनुसरुनी पेशा जरी
मी स्वयेंच करि चाकरी
तें रुचे न तुज अन्तरीं । जरी मी सेवक० ॥

मज अवमानियलें कुणी
तरि तें न तुला साहुनी
शासिसी तया मानिनी । जरी मी सेवक० ॥

मजविषयीं आस्था अशी
काळजी तशी चौकशी
कां दावुनि मज बुजविसी । असे मी सेवक० ॥

भलताच भाव कल्पुनी
कुजबुजती कांहीं कुणी
तें घेसि कसें ऐकुनी ॥ असे मी सेवक० ॥

जें व्हावें तुज वावडे
कां तेंच तुला आवडे ?
का दटाविसी हांसुनी ? । असे मी सेवक० ॥

---

# वन-विहार

[ जाति--माधवकरणी ]

गडे, जाउ चल जगापासुनी दूर जरा कोठें
नको प्रासाद तुङ्ग मोठे
उन्च तरू स्पर्शुनी नभाला मण्डप जेथ बने
अशीं हीं विहराया विपिनें.

प्रतिबिम्बा निज उषा पाहते प्रतिदिवशीं ज्यांत
असे हे गिरी हिमस्नात
विशाल ऐनेमहाल गमती विधिनें निर्मियले
मनीं परि पहा खजिल झाले
हीन मानिती स्वभाग्य बघुनी तुझी अङ्गकान्ती
जागच्या जागीं विरघळती

प्रवाहरूपें खळखळुनी तव गात गात महती
शरण जणुं चरणीं तव येती

लवल्या फान्दीवर फुललेल्या वेलींचीं जाळीं
भव्य हे शिलाखण्ड खालीं
बिलगुन कल्लोलिनी वाहते फेनधवलवसना
कञ्चनी रञ्जवि भूरमणा
किंवा सिंहासनासभोंवति जमलेले भाट
जसे कीं गाती स्तुतिपाठ
किंवा पथकें सामन्तांचीं देति रत्नराशी
खण्डणी नृपतिपदापाशीं

हीं इवलालीं रानफुलें किति मृदुल विविध रङ्गी
विखुरलीं पहा कोमलाङ्गी
मणिरत्नालङ्कृतीहुनी बहु आभरणें त्यांचीं
शोभतिल तव देहीं साचीं
ठायीं ठायीं प्रस्तर-सिंहासनें अशीं रानीं
शोभलीं छत्रचामरांनीं

विराजुनी त्यावरी शोभने कृतार्थ करि त्यांना
माझिया तेवि लोचनांना

प्रपात सन्निध कोसळुनी हा जलकणिका उधळी
कुन्तलीं पखरण ती झाली
काय निरपुनी तूंच टाकिसी अधर भाळ भृकुटी ?
कशाला सेवक मग निकटी ?

---

# हा काय माझा गुन्हा ?

[ जाति–प्रणयप्रभा ]

तुजकडे पाहतो पुन्हा पुन्हा
हा काय गडे माझाच गुन्हा ?

सतेज सुन्दर टपोर डोळे
भावचन्द्रिका जयांत खेळे
उचम्बळे हृत्‌सिन्धु तीमुळें
विसरेल कसा तो आत्मगुणा ?

छटा दृगांच्या जणुं शशिभवती
बटा कचांच्या निटिलावरती
मोर-पिसासम सदा नाचती
पिसें लावतिल त्या न कुणा ?

नाजुकतेचा मृदुल गालिचा
नाच तयावर आरोग्याच्या
ताम्बुस कान्तिमया लहरींचा
लाजवितेस उषा—अरुणा !

गालीं किञ्चित गोड फुगवटी
लवलवणारी सुबक हनुवटी
नजरेमधली लकब चोरटी
मदिरेस आणिती धुन्दपणा

नयन नासिका अभिनय वाणी
प्रखर परजल्या शस्त्रावाणी
विन्धिलेस तू मजसी त्यांनीं
काय न या पाहसी व्रणा ?

सन्मुख गमसी तू राका शशि
दुरून दिससी ताऱ्याऐशी
उजळशील पथ घन नैराश्यीं
उपजे हा भरवसा मना.

भयद न वाटावी ही अटवी
निज वास्तव्यें यास्तव नटवी
जननान्तरिंच्या आणिक पटवी
हृदयाच्या हृदयास खुणा
तुजकडे पाहतों पुन्हा पुन्हा.

# उत्कण्ठा

[ सुनीत ]

सृष्टीमाजि जशी प्रभात, चरितीं तैसें तुझ्या यौवन.
पूर्वा चिन्तितसे मनांत रविला, कोणास तू चिन्तिसी ?
प्रीतीच्या अरुणप्रभेंत विलसे तत्रापि पूर्वाऽनन
का गालीं नयनीं तुझ्या चमक ही यावी अपूर्वा अशी ?

प्रश्नाचा भलतीकडे वळवुनी तूं ओघ नेसी कधीं
पिच्छा मी पुरता परी पुरविता मिथ्याच तूं बोलसी
जेव्हां मी पुसतोच सोडुनि जरा सङ्कोच भीती तशी
साङ्गाया बुजुनी तरी न सजशी तूं गूज चित्तांतलें

आहे का तुझियासमीप बसला तो भाग्यशाली कुणी
ऐसे सूचकही विचारुन तुला सोत्कण्ठ मी पाहतो
सर्वांच्यावरती 'न'कार अवघा देसी कसा सारखा
माझा प्रश्न सुटेच ना ' तरि तुझा तो कोण आहे सखा ? '

देताना अवघे 'न'कार परि कां तूं पाहिलें चोरुनी
का लज्जान्वित ते 'न'कार अवघे 'हो'कार मानूं मनीं ?

# न्यायासनींच्या देवते !

[ गज्जल–श्यामला ]

कां वाद ऐसा माण्डिसी ? कां प्रश्न हें तूं घालिसी ?
कां जिङ्किल्या जीवा पुन्हा जिङ्कावयातें वाञ्छिसी ?

केव्हांच गे तूझ्यापुढें पाडाव माझा जाहला !
घायाळ झालेल्यावरी कां बाण आतां रोखिसी ?

केल्या गुन्ह्याची मी दिली तूतें कबूली कैकदा
तत्रापि वारंवार कां साक्षी-पुरावे मागसी ?

साक्षी हव्या ज्या ज्या तुला चित्तीं तुझा त्या नादती
देऊन त्यांना कान तू त्या कां न आधी ऐकसी ?

यादी पुराव्यांची पुरी आहे तुझ्या हृन्मन्दिरीं
कां तू परन्तू ठेविसी झाकून अन्तश्चक्षुसी ?

न्यायासनींच्या देवते ! कां व्यर्थ काङ्गावा असा ?
माझी अनन्या ही गती कां जाणिसी ना मानसीं ?

माझीं सुखें सारीं तुझ्या हातीं असोनी नन्दिनी !
तो हात हातीं द्यावया कां व्यूह ऐसा योजिसी ?

---



प्रेम-याचना.

# तुझियाविना

[ वृत्त–वियोगिनी ]

प्रतिभे ! तुझियाविना जिणें
    मज वैराण गमेल सर्वथा
नसता सलिलौघ ज्यापरी
    सरितेला उरते न चारुता

मजभोंवति मोर नाचले
    तरि व्हावें रममाण केविं मी
सहवास न लाभला तुझा
    तरि राहीन सदैव मी श्रमी !

जरि शीतल तारकायुता
    मज का ती अधिका विभावरी ?
रवि लोपवि तारका तिच्या
    नयनीं सन्तत त्या तुझ्या परि !

मज पुष्पसुगन्ध आवडे
परि तो केवळ तूझियामुळें
तुझियाविण काय त्यांमधी
इतुकें मोहक दिव्य आगळें ?

सुखकुम्भहि सन्तत लाभले
मनुजा दुर्मिळ जे जगावरी
नसता मम सङ्गतींत तूं
मजला त्यांतिल काय माधुरी ?

जरि दिव्यहि वैभवचन्द्रिका
मम शीर्षावरती विराजली
नसतां बिलगून तूं मला
तनुची होइल मात्र काहिली !

सुमशेजहि तूझियाविना
मजला होइल कण्टकापरी
मृदुता दगडासही परि
सहवासीं तुझिया खरोखरी !

तुझियाविण जादुगारिणी
मजला भीषण ही वसुन्धरा
तुझिया परि सङ्गतीमधें
अवघी भीषणताहि सुन्दरा !

तुझिया नयनांत जें दिसे
पटवी तें अधिकारपात्रता
वळवील तुझ्याविना तरी
मज बेबन्द जनास कोणता ?

ठरलीस मला विमोहुनी
सखये तूं जयशालिनी खरी
मम जीवितसार्वभौमता
म्हणुनी अर्पियली तुझ्या करीं !

सखि, रोज नव्या पराक्रमा
कुठुनी स्फूर्ति मला तुझ्याविना ?
तुझियाविण काय धन्यता
मज सम्पादुनि या यशोधना ?

जणु ब्रह्मसुता मदन्तरीं
  मज ती तूं गमशील या घरीं
घन काननही तुझ्यामुळें
  मजला हर्म्यचि सर्वतोपरी !

करि दूर न या कफल्लुका !
  असती तूं तर कल्पवल्लरी !
जणुं देइ निसर्ग सम्मति
  पडती पुष्पपराग हे शिरीं.

मिटल्या कमलांत भृङ्ग तो
  सविता मावळतीचिया घरीं
तरुला बघ वेष्टुनी लता
  सखि, हा सोबति तेंवि सावरी !

दा. क्र. ४९०७

# जर कधीं न होती भेट

[ जाति–भूपतिवैभव ]

जर तुझी नि माझी कधीं न होती भेट
तर हृदय कशानें घेतें माझें पेट ?
लागला आंत बाहेर अता अङ्गार
घेणार आणि तूं काय गडे माघार ?

जो प्रशान्त होता सिन्धु आजपावेतों
प्रक्षुब्ध जाहला दर्शनमात्रें तव तो
प्रक्षुब्धपणाची आणि लागली गोडी
प्रक्षुब्धपणांतच रमो निरन्तर होडी.
होडींत परन्तू पाहिजेस तू सङ्गें
वादळामधेंही हृदय का न मग रङ्गे
मज नको अता ती निश्चलता पूर्वींची
उसळोत सारख्या वितानचुम्बी वीची

जाशील आणि जर माझ्यापासुन दूर
वडवाग्नि सिन्धुला टाकिल शोषुन पार.
होईल तिथें मग वाळवण्ट वैराण
त्या सहारांत तडफडेल माझा प्राण !
मज नलगे होणें सहारांत हैराण
पुरवेल राहणें पेटत तें आमरण !

स्नेहांत तुझ्या दे पेटायाचा मान
चल टाक माझिया स्कन्धावरती मान
घेतली एकदा हृदयानें या पेट
चल कायमची दे मजसि हिमाङ्गी भेट !

---

# सङ्गमावर

[ जाति–चन्द्रकला ]

कुठुनि कसे आलों, आपुली झाली ही भेट
अखेरपावेतों न होवो कधिं ताटातूट
हीच आज वाञ्छा माझिया हेलावे पोटीं
शब्द धाव घेती बोलुनी दावाया ओठीं
कळींत सामावे तियेचा प्रकर्ष जैं पुढचा
शुक्तीमाजि जसा घडावा वास मौक्तिकाचा
अरुणाच्या रङ्गीं ज्यापरी विलास सूर्याचा
धवल भानुकिरणीं जन्म जैं इन्द्रधनुष्याचा
तेविं मला दिसतीं आपुल्या या भेटीमाजी
भव्य भविष्याचीं कोन्दलीं सुरम्य कारन्जीं.

कुठुनि कसे आलों; आपुली झाली ही भेट
अखेरपावेतों न होवो कधिं ताटातूट

विशेष हेतुविना जाहला प्रवास येथवरी
धन्य दिवस हा कीं पातलों सन्मुख आज परी
नव्हती आजवरी दिशेची ओळखही पुरती
मार्गावर कसली मनाला शिवली नच भीती
परि तो पथ सरला सम्पली विचारसरणी ती
सावधान आतां जाउ ये एक पथीं पुढती
दुरून येवोनी निमीलित होती जैं सरिता
अभिन्नता तैशी येउं दे आपुलिया चरिता.

प्रवासांत पुढच्या सङ्कटें दुक्खें तीव्र किती
क्षिति वाटावी कां तयांची परि तव साङ्गातीं ?
मृदु होतिल काटे फुलांसम येता त्वन्नयनीं
उजळिल पथ तिमिरीं दीप्ति जी विलसे तव चरणीं
असतां तूं सङ्गें घालुनी तुजला पाठीशीं
येइल झुन्जाया धीर तरि मला सङ्कटाशीं
हताश कधि होता तुझीया प्रेम-कटाक्षानें
नव चैतन्याचीं अन्तरीं फुलतिल उद्यानें
दावाग्नीहि मला चन्दनी उटीच भासेल
दाह विषाचाही सङ्गतीं तुझ्या साहवेल !

रम्य भद्र कालीं सङ्गमावरि थाम्बुनि थोडी
सेवूं ये सखये जीवितीं अननुभूत गोडी
तुझी आणि माझी शिदोरी कालवुनी येथें
कवळ मुखीं घेऊं देउं ये एकामेकातें
अङ्कावरि माझ्या आपुला टेकवुनी माथा
घाल गळां माझ्या आपुल्या स्निग्ध शीत हाता
स्थितींत या घेऊं विसावा, जाया शीण लया
निर्वच राहोनी बोलुं दे हृदयाशीं हृदया
आणि पुन्हां उठुनी घेउनी हातामधिं हात
एकरूप होऊं प्रवासी अखेरपर्यन्त !

---

## ताटातूट

का अशीं अचानक तुझ्या लोचनीं तुडुम्ब भरलीं जळें ?

नुकताच देवते कौल मला देउनी
केलेस मला स्वर्गीय सुखाचा धनी
ते घुमती मङ्गल अजुनी कानीं ध्वनी
तों व्हावी वरदायिनीच कम्पाकुला कशी ना कळे ?
कशानें तुडुम्ब भरलीं जळें ?

सरकतेस का बाजुला अशी चमकुनी ?
प्रणयिनी, निरन्तर राहूंया बिलगुनी
जगतास जाउं या सामोरे हासुनी
ब्रम्हाण्ड डोल हें धरील अपुल्या प्रेमकथा–परिमळें
कशाला तुडुम्ब भरलीं जळें ?

कावरीबावरी होसि कशानें परी ?
करि भीति कोणती विवर तुझ्या अन्तरीं ?
हा वेध कशाचा—ग्रहण कोणतें दुरी ?
विरघळे ना कळे काञ्चनगङ्गा कसल्या ग्रीष्मामुळें ?
कशानें तुडुम्ब भरलीं जळें ?

चाहूल कुणाची आली तुज चोरटी ?
अपुल्यांत कुणी का आणिल ताटातुटी ?
का हीच सुनन्दे भीति हृदयसम्पुटीं ?
जळ विभागतां का येइ नद्यांच्या परी सङ्गमांतलें ?
कशाला तुडुम्ब भरलीं जळें ?

हा शालिमार का भुरळ्यांची राहुटी ?—
कीं प्रेमधनाची कुणिहि करावी लुटी !
वादळीं जावया उडुन काय ही कुटी ?
प्रक्षुब्ध सागरीं दीपगृह का लाटांनीं डळमळे ?
कशाला तुडुम्ब भरलीं जळें ?

आलेंच खरोखर सङ्कट हें भामिनी !
दारांत थडकले राजदूत येउनी
जनकाचा तुझिया कैदी मी येथुनी
परि विभिन्न होतिल मीलित हृदयें काय नृपाच्या दळें ?
कशाला तुडुम्ब भरलीं जळें ?

चल ऊठ कटीची मिठी देइ सोडुनी
मज हीहि झेलणें प्राप्तच सौदामिनी
धरि धीर मङ्गले ! निरोप दे हासुनी
तव महाल होइल विजयपताका-स्थान प्रीतिच्या बळें !
कशाला तुडुम्ब भरलीं जळें ?

शालिमार–प्रेमाश्रम ( Abode of Love )

# साङ्ग तू सजा खुशाल

[ वृत्त–तूणक ]

साङ्ग तू सजा खुशाल कोणतीहि भूपते !
हृदय-दान-साङ्गता
करि तुझीच ती सुता
एवढ्यामुळेंच काय कोप न्यायदेवते ?

चुम्बिलें सुधांशुला
प्राशिलें हलाहला
याहुनी विशेष पेय पाजशील कोणतें ?

त्या हिमाङ्गिच्या भुजा
बिलगल्या गळ्यास ज्या
काय मृत्युचे तयास भिववितील पाश ते ?

मूर्त ती तडिल्लता
झेलिली जयें स्वता
कोणतेंहि अग्निदिव्य त्यास सौम्य भासतें !

पूजिलें शुभाङ्गिनें
ज्याप्रती तनू-मनें
नाचती सुळावरीहि त्याचिया मुखीं स्मितें !

साङ्ग घोर देहदण्ड
प्रेम वाढतें उदण्ड
ठेवितो नियन्त्रणीं न राजदण्ड प्रीतितें !

---

# नजर कैद

[ चाल-"वन्दन तुज मायभूमि हें अखेरचें" ]

कोण्डलेंस का विलासमन्दिरांत या ?
शासन हें साहवेल केविं राजया

प्रथम जेथ हृदयबन्ध जाहलें खुलें
लोचनांत ओळखिचे भाव बिम्बले
अस्फुट मग कांहींसे बोल उमटले
किलबिलत्या विहगांसहि मान्य जाहले
तोच थोर वृक्ष मला दिसत येथुनी
विस्तारें जो उदार रे तुझ्याहुनी
बुन्ध्यावर कोरियला लेख ज्याचिया
तोच वृक्ष सहज रोज मज दिसावया
व्याकळून अन्तरांत आणि जावया
कोण्डलेस का विलास मन्दिरांत या ?

भव्य शिलाखण्ड, वरी वृक्ष-वल्लरी
कलकलरव करणारी निकट निर्झरी

जेथ सुता तव गमली सृष्टिसुन्दरी
वागीश्वरि या हृदया स्वामिनी खरी
दिधलीं उधळून फुलें मी तिच्या शिरीं
भिजविलेंहि मजसि तिनें सलिलसीकरीं
क्रमिला दिन जेथ असा प्रेमलीलया
प्रेमतीर्थ सहज रोज तें दिसावया
व्याकळून अन्तरांत आणि जावया
कोण्डलेस का विलासमन्दिरांत या ?

स्वकरीं स्वीकारियलें मी तिच्या करा
साक्षी या ठेवुनिया गौरिशङ्करा
त्या उन्नत मानधना इथुनि पाहणें
आणि अन्तरांत अहोरात्र वितळणें
मनुजाच्या तो न पदीं कधि विटाळला
भाव आमुचाहि त्याच जाणतो कला
मग कशास लाम्बविसी नजरकैद ही
त्यागाया मी तयार सर्वथा मही
शासन हें साहवे न मात्र राजया
कोण्डलेस का विलासमन्दिरांत या ?

# वधस्तम्भापाशीं

[ जाति–मुद्रिका ]

मज देहान्ताची सजा साङ्गसी नृपा !
केवढी खरोखर झाली मजवरी तुझी ही कृपा !
किति सोपें कवटाळणें वधस्तम्भ हा
वास्तव्य मृत्युलोकींचें चुकवितो क्षणीं जो अहा !

सहकम्प पावलीं मनें जरी प्रीतिनें
भूकम्प जाहल्या ऐशीं हादरती जेथें जनें
माण्डिती आणि कल्लोळ गणुनि ते गुन्हे
का राजवटीमधि ऐशा, कण्ठणें तरी हें जिणें ?

अधिकार जिथें स्वातन्त्र्य घे हिरावुनी
नान्दणें स्वयं-तेजानें केविं त्या महालांतुनी ?
मम बन्दिवास सम्पतो आजला खरा
होतात अन्तरीं साऱ्या मम वृत्ति हर्षनिर्भरा !

ही मला न शिक्षा; तुझ्याच दुहितेप्रती !
इतुकेंहि केवि उमगाया असमर्थ तुझी हो मति ?
देऊन सजा मज तिला विन्धितोस कीं
चढवून सुळीं मज तीच्या घालिसी घाव मस्तकीं !

अत्युच्च पवित्र स्थळीं स्थापणें जया
का पायदळीं लोकांच्या ही करिसी त्याची रया ?
कविजनांस व्हावी सदाच जी स्तुत पदा
ती चव्हाट्यावरी ऐशी का फेकावी सम्पदा ?

मजवरती ज्यांनीं प्रेमसुधा वर्षिली
त्यांतुनी आसवें आता असतील पडत भूतलीं.
मज सन्मुख वदले स्फुरुनि भाव जे मुके
असतील अता शोकानें थरथरत अधर ते भुके.

झेलिली प्रणयधुन्द जी कुसुमकोमला
ती असेल पडली आतां भूवरी शोकविव्हला
दुर्दशा तिची ही दिसे मनश्चक्षुंना
इतुकीच काय ती होते जीवास मात्र यातना !

वाटतो मोक्षलाभ हा मला एरव्ही !
केव्हढी तुझ्या प्रेमाची प्रियतमे, असे थोरवी !
हा वियोग नोहे; सखी शोक कां वृथा ?
मम विलीन जीवज्योती होईल तव हृदीं अता



शोकविव्हला.

# मृत्युपन्थें

[ जाति–'अवनी' सारखी. राग–भूप ]

अजुनि तुझी आठवते अवगाहनलीला
नांव तुला मी दिधलें जैं "साहस-शीला"
कमलासव-सेवन-रत
भृङ्गातें न्याहळीत
बसलों मी बघुनी, द्रुत-
पुसिलें त्वां
"का हेवा
वाटतो कवीला" ?

फेन-धवल हंसयुगुल
मेळवितां कण्ठ-नाल
देखुनि ते प्रणयाकुल
खळबळले
नृप-बाळे !
तव मन त्या काला.

पोहत पाहून मला
अवगत तुज नसुनि कला
घेउनि तैं त्वा उडिला
लावलास
मात्र फास
माझिया गळ्याला !

त्यांतहि वदलीस पुन्हा
"स्फूर्तीचे क्षण कविंना
टिपुनि येति घ्याया ना ?
निखळुन का
नच उल्का
येइ भुवनगोला" ?

ज्यावर बेहोषपणें
विश्वासुन नृपकन्ये
उधळिलींस दृक्सुमनें
त्वत्स्मरणें
हें मरणें
उत्सवसम त्याला
अजुन तुझी आठवते अवगाहनलीला.

४९७३
दा. क्र.

# जय-मङ्गला

[ सुनीत ]

घोडा फेकित येइ वायुगतिनें ही कोण ? सौदामिनी ?
का तू भूषवितेस ही दहनभू धावूनिया भामिनी ?
माझा देखुनि वध्य वेश तुजला होतील ज्या यातना
तेणें शान्ति मदन्तरांतिल सखे भङ्गूनि जाईल ना ?

साक्षात्कार मला अनेक परिनें त्वत्प्रीतिचे जाहले
त्यांचे हृत्पटलांत लेख सखये जे कोरुनी ठेविले
पाठोनी लय चिन्तनांत तुझिया, पारायणीं त्यांचिया
आहे येथ सहर्ष सादर उभा भाग्यास या आलिया

स्पर्शें दिव्य तुझ्या प्रिये बधिरता देहास ज्या लाभली
प्रेमाची चढली मतीस अजुनी धुन्दी न ती सम्पली
तो पायीं अपुल्याच जाइल वधस्तम्भावरी हासत
प्रीतीचें परि दैन्य दावित जगा का येसि तू धावत ?

हा सन्देश परन्तु काय कथिसी ? पीयूष कीं वर्षिसी ?
प्रेमाची जयमङ्गलाच म्हणुनी तू येथ कीं ठाकसी ?

REFBK-0004971

REFBK-0004971

# लौकरच प्रसिद्ध होणारी

# पुस्तकें

श्री. प्र. के; अत्रेकृत

## ‘ बिचारीं बालकें ’

श्री. ‘ यशवंत’कृत.

## ‘ओजस्विनी’

श्री. अनंत काणेकरकृत

( नाटकें )

## घरकुल

व

## आधारस्तंभ


प्रकाशक-प्र. श्री. कोल्हटकर, बी. ए.

खटाववाडी, मुंबई नं. ४